# शेळीपालन योजना

आदिवासी उपयोजना (TSP) अंतर्गत अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांना 75% अनुदानावर 10 शेळ्या व 1 बोकड गट पुरवठा

## १. योजनेचा परिचय

**जिल्हा वार्षिक योजना-आदिवासी उपयोजना (TSP) अंतर्गत अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांना 75% अनुदानावर 10 शेळ्या व 1 बोकड गट पुरवठा करणे**

## २. योजनेचा उद्देश

अधिक मांस उत्पादनाकरीता शेळीपालन व्यवसायास प्रोत्साहन व चालना देणे तसेच शेळीपालन व्यवसायामधून पशुपालकांचा आर्थिक स्तर उंचावण्याकरीता सादर योजना राबविण्यात येत आहे.

## ३. योजनेचे फायदे / लाभ 💰

### मुख्य फायदे:

- ▶ शेळीपालन व्यवसायाद्वारे पशुपालकांचे आर्थिक उत्पन्न वाढवणे
- ▶ अनुसूचित जमातीच्या लाभार्थींना 75% अनुदानावर स्थानिक जातीच्या शेळी गटाचा (10 शेळ्या व 1 बोकड) पुरवठा
- ▶ उर्वरित 25% हिस्सा लाभार्थीने स्वतः उभारावा लागेल

## ४. शेळी गटाच्या किंमतीचे तपशील 📊

| अ. क्र. | बाब | शासकीय अनुदान | लाभार्थी हिस्सा | किंमत रुपये |
|---|---|---|---|---|
| 1 | 10 शेळ्या खरेदी प्रति शेळी रु. 6,000/- किंमती प्रमाणे | रु.45,000/- | रु.15,000/- | रु. 60,000/- |
| 2 | 1 बोकड खरेदी (रु.8,000/-) | रु. 6,000/- | रु. 2,000/- | रु. 8,000/- |
| 3 | 12.75% (अधिक 18% वस्तू व सेवाकर) या दराने तीन वर्षांचा विमा | रु. 7,673/- | रु. 2,558/- | रु. 10,231/- |
| **एकूण खर्च** | | **रु.58,673/-** | **रु.19,558/-** | **रु.78,231/-** |

## महत्वाची माहिती:

**शासकीय अनुदान:** 75% (रु.58,673/-)

**लाभार्थी हिस्सा:** 25% (रु.19,558/-)

**एकूण प्रकल्प किंमत:** रु.78,231/-

## ५. पात्रता निकष ✅

- दारिद्य रेषेखालील लाभार्थी
- अत्यल्प भूधारक शेतकरी (१ हेक्टर पर्यंतचे भूधारक)
- अल्प भूधारक शेतकरी (१ ते २ हेक्टर पर्यंतचे भूधारक)
- सुशिक्षित बेरोजगार (रोजगार व स्वयंरोजगार केंद्रात नोंद असलेले)
- महिला बचत गटातील लाभार्थी (अंक १ ते ४ मधील)

## ६. आवश्यक कागदपत्रे 📋

**अनिवार्य कागदपत्रे:**

- फोटो ओळखपत्राची सत्यप्रत (अनिवार्य)
- सातबारा (अनिवार्य)
- ८ अ उतारा (अनिवार्य)
- अपत्य दाखला (अनिवार्य) / स्वघोषणा पत्र

- ▶ आधारकार्ड (अनिवार्य)
- ▶ ७-१२ मध्ये लाभार्थी चे नाव नसल्यास कुटुंबाचे संमती पत्र, अथवा दुसऱ्यांची जमीन भाडे तत्वावर करारनामा (असल्यास अनिवार्य)
- ▶ अनुसूचीत जाती/जमाती असल्यास जातीच्या दाखल्याची सत्यप्रत (असल्यास अनिवार्य)
- ▶ रहिवासी प्रमाणपत्र (असल्यास अनिवार्य)
- ▶ दारिद्र रेषेखालील असल्याचे प्रमाणपत्र (असल्यास अनिवार्य)
- ▶ बँक खाते पासबुक सत्यपत्र (असल्यास अनिवार्य)
- ▶ रेशनकार्ड / कुटुंब प्रमाणपत्र (एकाच कुटूंबातील एकच व्यक्तीला लाभ घेता येईल.) (असल्यास अनिवार्य)
- ▶ दिव्यांग असल्यास दाखला (असल्यास अनिवार्य)
- ▶ बचत गट सदस्य असल्यास त्याचे प्रमाणपत्र किंवा बचत गटाच्या बँक खात्याच्या पासबुकाची पहिल्या पानाची साक्षांकित प्रत
- ▶ वय - जन्मतारखेचा पुरावा सत्यप्रत
- ▶ शैक्षणिक पात्रतेचा दाखला
- ▶ रोजगार, स्वयंरोजगार कार्यालयाचे नाव नोंदणीकार्डची सत्यप्रत
- ▶ प्रशिक्षण घेतले असल्यास प्रमाणपत्राची छायांकित प्रत

## ७. अर्ज करण्याची प्रक्रिया 🌐

**ऑनलाईन योजना:** ऑनलाईन योजनेच्या वेळापत्रकाप्रमाणे विहित मुदतीत शासनाचे संकेतस्थळ http://ah.mahabms.com यावर विहीत नमुन्यांत अर्ज ऑनलाईनद्वारे सादर करावा.

## १०. जबाबदार अधिकारी व संपर्क माहिती 📞

### योजना समन्वयक (जि.प.चंद्रपूर):

**जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद चंद्रपूर**
**नाव:** डॉ. प्रमोद जल्लेवार
**मोबाईल नंबर:** 8007738298
**ई-मेल:** dahochandrapur@gmail.com